१५९

# MAHARASHTRA ACT No. XIX OF 1985

## THE MAHARASHTRA SALES TAX ON THE TRANSFER OF PROPERTY IN GOODS INVOLVED IN THE EXECUTION OF WORKS CONTRACTS ACT, 1985

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राज्यपाल यांची संमती दिनांक १२ ऑगस्ट १९८५, रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन्. चौधरी,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. XIX OF 1985

## AN ACT TO LEVY AND COLLECT THE TAX ON THE TRANSFER OF PROPERTY IN GOODS (WHETHER AS GOODS OR IN SOME OTHER FORM) INVOLVED IN EXECUTION OF WORKS CONTRACTS IN THE STATE OF MAHARASHTRA.

(राज्यपाल यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १४, ऑगस्ट १९८५, रोजी प्रथम (इंग्रजीत प्रसिद्ध केलेला.)

## सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९.

**महाराष्ट्र राज्यातील कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील (मालाच्या रूपातील वा अन्य कोणत्याही रूपातील) मत्तेच्या हस्तांतरणावर कर आकारणे व त्याची उगराणी करणे यासाठी अधिनियम.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यातील कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मत्तेच्या (मालाच्या रूपातील वा अन्य कोणत्याही रूपातील) हस्तांतरणावर कर आकारणे व त्याची उगराणी करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या छत्तिसाव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास 'महाराष्ट्र कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मत्तेच्या हस्तांतरणावरील विक्रीकर अधिनियम, १९८५' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्याला लागू होईल.

(३) राज्य शासन शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा तारखेस तो अंमलात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) "नियत दिवस" म्हणजे अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक;

१९५९ चा मुंबई ५१. (२) "मुंबई विक्रीकर अधिनियम" म्हणजे 'मुंबई विक्रीकर अधिनियम, १९५९';

(३) "आयुक्त" म्हणजे 'मुंबई विक्रीकर अधिनियमा' खाली विक्रीकर आयुक्त म्हणून नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती;

(४) "व्यापारी" म्हणजे जी कोणतीही व्यक्ती रोख रकमेच्या, आस्थगित प्रदानाच्या किंवा मूल्यवान प्रतिफलाच्या बदल्यात कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मत्ता ही मूल्यवान प्रतिफल, अडत (कमिशन) घेऊन वा पारिश्रमिक घेऊन किंवा अन्यथा हस्तांतरित करते अशी कोणतीही व्यक्ती होय, आणि या संज्ञेत, जे याप्रमाणे अशा मालातील मत्तेचे हस्तांतरण करते असे राज्य शासन, केंद्र शासन आणि तसेच जी कोणतीही सोसायटी, क्लब किंवा व्यक्तिसंघ आपल्या सदस्यास अशा मालातील मत्तेचे हस्तांतरण करते त्यांचा समावेश होतो;

(५) "माल" म्हणजे कार्य कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भुत असलेली सर्व प्रकारची मत्ता (मालाच्या रुपातील वा अन्य कोणत्याही रुपातील).

(६) "व्यक्ती" या संज्ञेत कोणतीही कंपनी किंवा माणसांचा निकाय—मग तो विधि संस्थापित असो किंवा नसो—आणि तसेच हिंदू अविभक्त कुटुंब, भागीदारी संस्था व स्थानिक प्राधिकरण यांचा समावेश होतो;

(७) "विहित केलेले" म्हणजे नियमान्वये विहित केलेले होय;

(८) "नोंदलेला व्यापारी" म्हणजे कलम ७ अन्वये नोंदलेला व्यापारी होय;

(९) "नियमावली" म्हणजे या अधिनियमान्वये केलेले नियम होत;

(१०) "विक्री" म्हणजे रोख रकमेच्या, आस्थगित प्रदानाच्या किंवा अन्य कोणत्याही मूल्यवान प्रतिफलाच्या बदल्यात, कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील मत्तेचे हस्तांतरण; आणि "विक्री करणे/विकणे" या संज्ञेचे व्याकरणिक रूपभेद व सजातीय शब्दप्रयोग यांसुद्धा या संज्ञेचा अर्थ त्याप्रमाणे लावण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ, कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेला हस्तांतरित माल कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीसाठी त्या मालाचा उपयोग, विनियोग किंवा विनियोजन करण्याच्या वेळी महाराष्ट्र राज्यात असेल तर, त्या मालातील मत्तेचे हस्तांतरण महाराष्ट्र राज्यात करण्यात आले असे मानण्यात येईल—मग कार्य-कंत्राटाचा करार कोणत्याही ठिकाणी करण्यात आलेला असो आणि संबंधित पक्षाची संमती असा उपयोग, विनियोग किंवा विनियोजन करण्यापूर्वी घेतलेली असो वा त्यानंतर घेतलेली असो;

(११) "विक्री किंमत" म्हणजे कोणताही माल कोणत्याही प्रयोजनार्थ (मग ते विनिर्दिष्ट कालावधीसाठी असो किंवा नसो) वापरण्याच्या हक्काचे हस्तांतरण करण्याबद्दल मिळालेल्या किंवा मिळण्याजोग्या मूल्यवान प्रतिफलाची रक्कम होय;

(१२) "अनुसूची" म्हणजे ह्या अधिनियमास जोडलेली अनुसूची;

(१३) "राज्य" म्हणजे महाराष्ट्र राज्य;

(१४) "कर" म्हणजे या अधिनियमाखाली प्रदेय असलेला कर;

(१५) "विक्री-व्यवहारांची उलाढाल" म्हणजे कार्य-कंत्राटात—मग ते कंत्राट एका ठराविक वर्षात पूर्णत: किंवा अंशत: पार पाडलेले असो—अंतर्भूत असलेल्या मालातील मत्तेचे हस्तांतरण करण्याच्या संबंधात व्यापाऱ्याला वर्षभरात मिळालेल्या किंवा मिळण्याजोग्या विक्री-किमतींची एकवट आणि त्या संज्ञेत, व्यापाऱ्याला विक्रीच्या किमतीचा भाग म्हणून मिळालेल्या कोणत्याही अग्रिमाचा समावेश होतो;

(१६) "कार्य-कंत्राट" म्हणजे अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्यांपैकी कोणतेही काम पार पाडण्यासाठी केलेले कंत्राट आणि या संज्ञेमध्ये पूर्णत: किंवा अंशत: पार पाडलेले अशा

काम पूर्ण होण्यापूर्वी सोडून दिलेले किंवा थांबवण्यात आलेले कंत्राट किंवा पोट-कंत्राट याचाही समावेश होतो, आणि अशा कोणत्याही कामासाठी केलेल्या पोट-कंत्राटाचाही अंतर्भाव होतो;

(१७) "वर्ष",—

(अ) म्हणजे वित्तीय वर्ष;

(ब) कोणत्याही विशिष्ट नोंदलेल्या व्यापाऱ्याच्या संबंधात या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ (कलम ५ व ७ वगळून) त्याचा अर्थ, त्या व्यापाऱ्याचे हिशेब त्याच्या वह्यांमध्ये सामान्यपणे ज्या वर्षास अनुलक्षून ठेवण्यात येतात ते वर्ष असा होतो—पण यासंबंधात लेखी अधिकथन देऊन व्यापारी वित्तीय वर्षाचा वैकल्पिक पर्याय पसंत करू शकेल :

परंतु, नोंदलेल्या व्यापाऱ्याने असा विकल्पाधिकार एकदा वापरलेला असल्यास, त्याला आयुक्ताच्या संमतीखेरीज व आयुक्त ठरवील त्या शर्ती अनुसरल्याखेरीज, त्याबाबतीत कोणताही बदल करता येणार नाही.

## प्रकरण दोन

### कराचा भार व आकारणी

३. ह्या अधिनियमामध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींच्या अधीनतेने, पुढील गोष्टींच्या संबंधात विक्रीच्या उलाढालीवर कर आकारणीयोग्य असेल— कराचा भार

(एक) नियत दिवशी किंवा त्या दिवसानंतर अंमलबजावणी सुरू केलेले किंवा चालू ठेवलेले कार्य-कंत्राट—मग असे कंत्राट नियत दिवसापूर्वी अगर नियत दिवशी किंवा त्या दिवसानंतर करण्यात आलेले असो वा नसो;

(दोन) ज्याची अंमलबजावणी नियत दिवसापूर्वी सुरू केलेल्या कार्य-कंत्राटाच्या बाबतीत, नियत दिवशी किंवा त्या दिवसानंतर अशा कंत्राटाच्या संबंधात मिळालेल्या किंवा मिळण्याजोग्या विक्री-किंमतीच्या मर्यादेपर्यंत—मग नियत दिवसापूर्वी आधीच पार पाडलेल्या कामाची व्याप्ती कितीही असो.

४. कार्य-कंत्राटाच्या अंमलबजावणीत अंतर्भूत असलेल्या मालातील (मालाच्या रूपातील किंवा अन्य कोणत्याही रूपातील) मत्तेच्या हस्तांतरणाच्या बाबतीत केलेल्या विक्रीव्यवहारांच्या उलाढालीतून, कार्य-कंत्राटाचा भाग असलेल्या एखाद्या कामासाठी स्वतंत्रपणे करण्यात आलेल्या पोट-कंत्राटाच्या बाबतीत या अधिनियमाखाली नोंदलेल्या व्यापाऱ्याने केलेल्या विक्री व्यवहारांच्या उलाढालीची रक्कम वजा केल्यानंतर राहिलेल्या रकमेवर, राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे वेळोवेळी विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे, रुपयाला जास्तीत जास्त पंधरा पैसे अशा दराने कर आकारण्यात येईल : कराची आकारणी.

परंतु, कपातीची मागणी करणाऱ्या व्यापाऱ्याने, त्याने मालाची विक्री केल्याच्या तारखेस त्याचे नोंदणीप्रमाणपत्र अंमलात होते अशा आशयाचे प्रमाणपत्र असणारे पोट-कंत्राटदाराचे देयक (बिल) किंवा रोखीचे ज्ञापन सादर केल्याशिवाय अशा प्रकारची कोणतीही कपात करता येणार नाही. अशा प्रमाणपत्रावर पोट-कंत्राटदार असलेल्या व्यापाऱ्याची किंवा याबाबतीत त्याने यथोचितरीत्या प्राधिकृत केलेल्या व्यक्तीची सही असावी लागेल :

परंतु आणखी असे की, कोणत्याही वर्षासाठी कपातीची मागणी करणाऱ्या व्यापाऱ्याची उलाढाल ही कपातीचा अंतर्भाव होण्याइतकी पुरेशी नसेल त्याबाबतीत त्या वर्षातील व्यापाऱ्याच्या उलाढालीच्या मर्यादेपर्यंत ती कपात अनुज्ञेय असेल आणि उर्वरित कपात ही पुढील वर्षात चालू ठेवण्यात येईल.

स्पष्टीकरण.—ह्या कलमाच्या प्रयोजनार्थ प्रत्येक कार्य-कंत्राटाच्या संबंधात कपातीची गणना स्वतंत्रपणे करण्यात येईल.

**व्यापाऱ्याचे दायित्व.** ५. (१) ज्या व्यापाऱ्याने---

(एक) ३१ मार्च १९८५ रोजी संपणाऱ्या, किंवा

(दोन) १ एप्रिल १९८५ रोजी सुरू होणाऱ्या,

वर्षभरात केलेल्या सर्व विक्रीव्यवहारांची उलाढाल पाच लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा अधिक झाली असेल किंवा होत असेल असा प्रत्येक व्यापारी नियत दिवशी किंवा त्यानंतर पोट-कलम (३) अन्वये कर भरण्याचे दायित्व संपेतोवर या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असेल :

परंतु, ज्यास खंड (दोन) लागू होतो आणि ज्याची नियत दिवसाच्या नंतरच्या सर्व विक्रीव्यवहारांची उलाढाल पाच लाख रुपये या मर्यादेपेक्षा अधिक होते तो व्यापारी १ एप्रिल १९८५ या दिवसापासून गणना केली असता जेव्हा त्याच्या विक्रीव्यवहारांची उलाढाल पहिल्याप्रथम अशा मर्यादेपेक्षा अधिक होईल त्या वेळेपर्यंत झालेल्या विक्रीव्यवहारांच्या बाबतीत कर भरण्यास दायी नसेल.

(२) ज्या व्यापाऱ्याच्या बाबतीत, पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या वर्षाच्या नंतर १ एप्रिल १९८५ या दिवसापासून सुरू होणाऱ्या वर्षातील विक्रीव्यवहारांची उलाढाल पहिल्या प्रथम पाच लाख रुपये मर्यादेपेक्षा अधिक होईल असा प्रत्येक व्यापारी, पोट-कलम (३) अन्वये कर भरण्याचे दायित्व संपेतोवर उक्त दिनांकापासून त्या अधिनियमान्वये कर भरण्यास पात्र असेल :

परंतु, उक्त वर्षाच्या १ एप्रिल या दिवसापासून गणना केली असता जेव्हा त्याच्या विक्रीव्यवहारांची उलाढाल पहिल्या प्रथम पाच लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा अधिक होईल त्यावेळेपर्यंतच्या कालावधीत झालेल्या विक्रीव्यवहारांच्या बाबतीत, व्यापारी कर भरण्यास पात्र असणार नाही.

(३) जो व्यापारी या अधिनियमाखाली कर भरण्यास दायी होतो असा प्रत्येक व्यापारी त्याचे नोंदणी प्रमाणपत्र रीतसर रद्द होईपर्यंत याप्रमाणे दायी असण्याचे चालू राहील आणि प्रमाणपत्र याप्रमाणे रद्द करण्यात आल्यावर, आधीच आकारलेला किंवा आकारण्याजोगा कर सोडून अन्य कर भरण्याचे त्याचे दायित्व हे त्याच्या विक्रीव्यवहारांची उलाढाल पुन्हा पहिल्या प्रथम पाच लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा अधिक होईपर्यंत थांबेल :

परंतु, पूर्वी म्हटल्याप्रमाणे ज्या वर्षात व्यापारी दायी असण्याचे थांबेल त्याच वर्षात जर तो पुन्हा करभरणा करण्यास पात्र झाला तर, कराच्या दायित्व समाप्तीच्या तारखेस सुरू होणाऱ्या व ज्या दिवशी त्याच्या विक्रीव्यवहारांची उलाढाल पहिल्या प्रथम अशा मर्यादेपेक्षा अधिक होईल त्या तारखेस संपणाऱ्या कालावधीत जे विक्रीव्यवहार होतील त्यांच्या बाबतीत कर द्यावा लागणार नाही.

**व्यापाऱ्याकडून प्रदेय विक्रीकर.** ६. या अधिनियमातील तरतुदी आणि त्याखाली करण्यात आलेले नियम यांच्या अधीनतेने, या अधिनियमान्वये जो कर भरण्यास पात्र आहे अशा प्रत्येक व्यापाऱ्याला, कार्य-कंत्राटासंबंधी केलेल्या विक्रीव्यवहारांच्या उलाढालीवर कलम ४ अनुसार आकारणीयोग्य कर द्यावा लागेल.

## प्रकरण तीन

### नोंदणी

**नोंदणीचे प्रमाणपत्र.** ७. (१) जो व्यापारी या अधिनियमान्वये कर भरणा करण्यास पात्र होईल असा कोणताही व्यापारी त्याच्याकडे या अधिनियमामध्ये तरतूद केल्यानुसार केलेले वैध नोंदणी प्रमाणपत्र असल्याशिवाय, कोणत्याही कार्य-कंत्राटाची अंमलबजावणी करू किंवा चालू ठेवू शकणार नाही :

परंतु, जर व्यापाऱ्याने विहित अवधीमध्ये अशा नोंदणीसाठी अर्ज केला असेल तर, त्याने कार्य-कंत्राटाची अंमलबजावणी करणे किंवा करण्याचे चालू ठेवणे कायदेशीर ठरेल.

(२) ज्याच्याकडे नोंदणीचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे अशा प्रत्येक व्यापाऱ्याला, विहित असेल अशा पद्धतीने आणि अशा प्राधिकरणाकडे अर्ज करावा लागेल.

(३) प्राधिकरणाने स्वत:ला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, जर ते नोंदणीसाठीचा अर्ज व्यवस्थित आहे अशी त्याची खात्री पटली तर, प्राधिकरण अर्जदाराची नोंदणी करील आणि विहित नमुन्यात नोंदणीचे प्रमाणपत्र अर्जदारास देईल.

(४) प्राधिकरण या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीनुसार देण्यात आलेली किंवा अन्यथा मागवलेली किंवा प्राप्त झालेली कोणतीही माहिती विचारात घेतल्यानंतर नोंदणीचे प्रमाणपत्र वेळोवेळी सुधारू शकेल.

(५) जर या कलमानुसार एखाद्या व्यक्तीच्या अर्जावरून ती व्यक्ती व्यापारी म्हणून नोंदण्यात आली असता मागाहून असे आढळले की, त्याची या कलमाच्या तरतुदींनुसार नोंदणी करावयास नको होती, तर तो कलम ५ अन्वये कर भरणा करण्यास पात्र नसला तरी, त्याचे नोंदणी प्रमाणपत्र अंमलात आले त्या तारखेपासून ते रद्द होईपर्यंत त्याने केलेल्या विक्री-व्यवहारांवर कर भरण्यास तो पात्र राहील.

(६) जर नोंदलेल्या व्यापाऱ्याने कार्य-कंत्राटाची अंमलबजावणी करण्याचे काम बंद केले किंवा हस्तांतरित केले किंवा अन्यथा निकालात काढले अथवा नोंदलेल्या व्यापाऱ्याच्या विक्री-व्यवहारांची उलाढाल एखाद्या वर्षी पाच लाख रुपयांच्या मर्यादेपेक्षा अधिक झाली नाही आणि व्यापाऱ्याने त्याचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यासाठी विहित पद्धतीने अर्ज केला तर, विहित प्राधिकरण नियमांप्रमाणे ते ठरवील अशा तारखेपासून नोंदणी रद्द करील.

(७) जेथे एखाद्या नोंदलेल्या व्यापाऱ्याने कार्य-कंत्राटाची अंमलबजावणी करण्याचे काम बंद केले किंवा हस्तांतरित केले किंवा अन्यथा निकालात काढले असून, नोंदणीचे प्रमाणपत्र रद्द करण्यासाठी पोट-कलम (६) अन्वये अर्ज करण्यास तो चुकला आहे अशी आयुक्ताची खात्री झाली तर, व्यापाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, आयुक्त नोंदलेल्या व्यापाऱ्याने सदर काम बंद केल्याची किंवा हस्तांतरित केल्याची किंवा निकालात काढल्याची तारीख म्हणून जी तारीख ठरवील त्या तारखेपासून नोंदणी रद्द करू शकेल :

परंतु, व्यापाऱ्याच्या अर्जावरून किंवा अन्यथा नोंदणीचे प्रमाणपत्र रद्द झाल्यामुळे रद्द करण्याच्या तारखेपर्यंतच्या कोणत्याही कालावधीकरिता देय असलेला कर (कोणताही दंड धरून) भरण्याच्या व्यापाऱ्याच्या दायित्वावर परिणाम होणार नाही—मग असा कर (कोणताही दंड धरून) रद्द करण्याच्या तारखेपूर्वी किंवा त्या तारखेनंतर निर्धारित केलेला असो.

## प्रकरण चार

### 'मुंबई विक्रीकर अधिनियमा' च्या विवक्षित तरतुदी लागू करणे

८. (१) या अधिनियमाच्या अन्य तरतुदींच्या आणि त्या खाली केलेल्या नियमांच्या अधीन- 'मुंबई विक्री-
तेने, ज्या प्राधिकरणांना 'मुंबई विक्रीकर अधिनियमा' खाली कोणत्याही कराचे निर्धारण करणे, कर अधिनिय-
पुनर्निर्धारण करणे, उगराणी करणे, आणि सक्तीने वसुली करणे याकरिता अधिकार प्रदान झालेला मा' खालील
आहे ती प्राधिकरणे या अधिनियमाखाली व्यापाऱ्यांकडून प्रदेय असलेला कोणताही कर (दंडसुद्धा) प्राधिकरणांना
हा जणू काही 'मुंबई विक्रीकर अधिनियमा' खाली प्रदेय असलेला कर वा दंड असावा त्या-या अधि-
प्रमाणे त्याचे निर्धारण, पुनर्निर्धारण, उगराणी आणि सक्तीने वसुली करतील आणि त्यांना 'मुंबई नियमाअन्वये
विक्रीकर अधिनियमा' खाली जे अधिकार आहेत ते सर्व किंवा त्यापैकी कोणतेही अधिकार कराचे निर्धा-
त्यांना या प्रयोजनार्थ वापरता येतील, आणि कराची प्रतिवेदने (Roturns), निर्धारण, आगाऊ रण, पुन-
भरणा, दुरुस्ती, उगराणी, समपहरण, अधिनियमानुसार कर भरण्यास पात्र असलेल्या व्यापाऱ्याच्या निर्धारण
हस्तांतरितीची नोंदणी, कर भरण्याचे व्यापाऱ्याचे दायित्व अशा व्यापाऱ्याच्या हस्तांतरितीवर इत्यादी
किंवा उत्तराधिकाऱ्यावर लादणे, कोणत्याही भागीदारी संस्थेवर किंवा हिंदू अविभक्त कुटुंबावर करण्यासाठी
असलेले कर भरण्याचे दायित्व अशा भागीदारी संस्थेचे विसर्जन झाल्यामुळे किंवा हिंदू अविभक्त अधिकार
कुटुंबाचे विभाजन झाल्यामुळे हस्तांतरित होणे, कराची वसुली करण्याची विशेष पद्धती, अपीले, प्रदा करणे.
पुनरीक्षण, निर्देशने, परतावे, वटाव, दंड, व्याज आकारणे किंवा भरणे, अपराध आपसात मिटवणे,
व्यापाऱ्याने सादर केलेले कागदपत्र गोपनीय म्हणून समजणे यासंबंधी 'मुंबई विक्रीकर अधि-
नियमा' च्या तरतुदी यथोचित फेरफारांसह तदनुसार लागू होतील.

(२) 'मुंबई विक्रीकर अधिनियमा' तील अपराध व दंड यांच्याशी संबंधित असलेल्या सर्व तरतुदी (एखाद्या अपराधाबद्दल खटला गुदरण्याऐवजी केलेला दंड किंवा एखाद्या अपराधाबद्दल असलेला दंड किंवा शिक्षा यांच्या व्यतिरिक्त असलेले जादा दंड यांच्या बाबतीतील तरतुदींसह) जणू काही या अधिनियमाखाली प्रदेय असलेला कर हा 'मुंबई विक्रीकर अधिनियमा' खालील प्रदेय कर असावा त्याप्रमाणे, या अधिनियमान्वये ज्यांची उगराणी करणे आवश्यक आहे अशा कराचे निर्धारण, पुनर्निर्धारण, उगराणी व सक्तीची कर-वसुली यांच्या बाबतीत अथवा असे निर्धारण, पुनर्निर्धारण उगराणी किंवा सक्तीची वसुली यांच्या संबंधातील कोणत्याही कार्यवाहीच्या बाबतीत, यथोचित फेरफारांसह लागू होतील.

## प्रकरण पाच

### संकीर्ण आणि नियम

अनुसूचीत सुधारणा करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

९. राज्य शासनास, वेळोवेळी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, कार्य-कंत्राटात अंतर्भूत असलेल्या मालातील (मालाच्या रूपातील वा अन्य रूपातील) मत्ता हस्तांतरित करण्याच्या संबंधात कोणतीही नोंद समाविष्ट करून अनुसूचीमध्ये सुधारणा करता येईल आणि त्यानंतर ती अनुसूची या अधिनियमाखालील कर-आकारणीच्या प्रयोजनासाठी तदनुसार सुधारित होईल.

नियम करण्याचा अधिकार.

१०. (१) राज्य शासनास सर्वसाधारणतः या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता नियम करता येतील.

(२) विशेषकरून आणि पोट-कलम (१) खालील नियम करण्याच्या अधिकाराच्या व्यापकतेस बाध न येता, या नियमांत पुढील गोष्टींसाठी तरतुदी करता येतील :—

(अ) कलम ७, पोट-कलम (१) अन्वये व्यापाऱ्याला नोंदणीकरता किती मुदतीत अर्ज करावा लागेल ;

(ब) कलम ७, पोट-कलम (२) अन्वये नोंदणी प्रमाणपत्राकरता कोणत्या रीतीने व कोणत्या प्राधिकरणाकडे अर्ज करावा लागेल ;

(क) कलम ७, पोट-कलम (२) अन्वये द्यावयाच्या नोंदणी प्रमाणपत्राचा नमुना ;

(ड) कलम ७, पोट-कलम (६) अन्वये नोंदणी प्रमाणपत्र रद्द करून घेण्याकरता कशा रीतीने अर्ज करावा लागेल, व कोणते प्राधिकरण असे प्रमाणपत्र रद्द करील ;

(इ) विहित करणे आवश्यक असेल किंवा विहित करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) कोणतेही नियम करताना राज्य शासन असा निदेश देऊ शकेल की, त्यांचा भंग झाल्यास तो अपराध जास्तीत जास्त दोन हजार रुपये एवढ्या द्रव्यदंडास आणि असा अपराध चालू राहणारा असेल तर, असा अपराध करण्याचे चालू असेल त्या काळात दिवसागणिक जास्तीत जास्त शंभर रुपये एवढ्या द्रव्यदंडास पात्र ठरेल.

(४) या कलमाखाली करण्यात आलेले नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील :

परंतु, त्वरित कारवाई करणे जीमुळे आवश्यक झाले आहे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल राज्य शासनाची खात्री झाल्यास, त्यास या कलमान्वये करण्यात यावयाच्या कोणत्याही नियमाच्या बाबतीत पूर्वप्रसिद्धीची ही शर्त काढून टाकता येईल.

(५) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर, होईल तितक्या लवकर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, त्याच्या प्रत्येक सभागृहासमोर एका अधिवेशनाने अथवा क्रमवर्ती दोन अधिवेशने मिळून बनलेल्या अशा एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरिता ठेवला जाईल,

आणि ज्या अधिवेशनात तो अशाप्रकारे ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्या पाठोपाठचे अधिवेशन संपण्यापूर्वी जर, त्या नियमात कोणताही बदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले आणि असा निर्णय त्यांनी शासकीय राजपत्रात अधिसूचित केला तर, अशी अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तो नियम अशा बदललेल्या रूपातच परिणामक होईल किंवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही. तथापि, अशा कोणत्याही बदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमाखाली करण्यात आलेल्या कोणत्याही कृतीच्या किंवा अकृतीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

## अनुसूची

[कलम २ (१६) आणि ९ पहा]

| अनुक्रमांक | कार्य-कंत्राटाचा निर्देश |
|---|---|
| १ | संयंत्रे आणि यंत्रसामग्री तयार करण्यासाठी आणि बसवण्यासाठी केलेल्या कार्य-कंत्राटाच्या अंमलबजणीकरिता लागणाऱ्या मालातील मत्तेचे हस्तांतरण. |
| २ | कैंची (ट्रस्सेस) किंवा पॉलिन तयार करणे आणि त्यांची उभारणी करणे यांसह, संरचनात्मक कामे तयार करण्यासाठी आणि उभारण्यासाठी केलेल्या कार्य-कंत्राटाच्या अंमलबजावणीकरिता लागणाऱ्या मालातील मत्तेचे हस्तांतरण. |
| ३ | याऱ्या (क्रेन्स) किंवा उच्चलन यंत्रे (हॉईस्ट) तयार करण्यासाठी आणि बसवण्यासाठी केलेल्या कार्य-कंत्राटाच्या अंमलबजावणीकरिता लागणाऱ्या मालातील मत्तेचे हस्तांतरण. |
| ४ | उद्वाहने (इलेव्हेटर) किंवा सरकते जिने (एस्केलेटर) तयार करण्यासाठी आणि बसवण्यासाठी केलेल्या कार्य-कंत्राटाच्या अंमलबजावणीकरिता लागणाऱ्या मालातील मत्तेचे हस्तांतरण. |
| ५ | गुंडाळी झडपा (रोलींग शटर) किंवा घडीची दारे (कोलॅप्सिबल गेट) तयार करण्यासाठी आणि बसवण्यासाठी केलेल्या कार्य-कंत्राटाच्या अंमलबजावणीकरिता लागणाऱ्या मालातील मत्तेचे हस्तांतरण. |
| ६ | इमारती, पूल बांधणे किंवा मार्ग तयार करणे यांसारखी स्थापत्य बांधकामे करण्यासाठी आणि त्यांची दुरुस्ती करण्यासाठी केलेल्या कार्य-कंत्राटाच्या अंमलबजावणीकरता लागणाऱ्या मालातील मत्तेचे हस्तांतरण. |
| ७ | दरवाजे, खिडक्या, चौकटी किंवा ग्रिल इत्यादी बसवण्यासाठी केलेल्या कार्य-कंत्राटाच्या अंमलबजावणीकरिता लागणाऱ्या मालातील मत्तेचे हस्तांतरण. |
| ८ | फरशी, लाद्या, दगड किंवा पत्रे बसविण्यासाठी केलेल्या कार्य-कंत्राटाच्या अंमलबाजावणीकरिता लागणाऱ्या मालातील मत्तेचे हस्तांतरण. |
| ९ | वातानुकूलन सामग्रीच्या डीपफ्रिझर, शीतागार संयंत्र, आर्द्रताकारी किंवा निरार्द्रकारी संयंत्रे बसविण्यासाठी केलेल्या कार्य-कंत्राटाच्या अंमलबजावणीकरता लागणाऱ्या मालातील मत्तेचे हस्तांतरण. |

अनुसूची—चालू

| अनुक्रमांक | कार्य-कंत्राटाचा निर्देश |
|---|---|
| १० | वातानुकूलन यंत्र बसवण्यासाठी केलेल्या कार्य-कंत्राटाच्या अंमलबजावणीकरिता लागणाऱ्या मालातील मत्तेचे हस्तांतरण. |
| ११ | विद्युतविषयक जोडण्या किंवा विद्युत-सामग्री बसवण्यासाठी केलेल्या कार्य-कंत्राटाच्या अंमलबजावणीकरिता लागणाऱ्या मालातील मत्तेचे हस्तांतरण. |
| १२ | अंतर्गत सजावटीची कंत्राटे धरून फर्निचर व खिळण्या, पार्टिशने, इत्यादींसाठी केलेल्या कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीकरिता लागणाऱ्या मालातील मत्तेचे हस्तांतरण. |
| १३ | तिचाकी वाहने धरून मोटार वाहनाच्या चासीवर वाहनाचा गाडा बसवण्यासाठी केलेल्या कार्य-कंत्राटाच्या अंमलबजावणीकरिता लागणाऱ्या मालातील मत्तेचे हस्तांतरण. |
| १४ | रेल्वेकडून पुरविण्यात आलेल्या अन्डरकॅरेजेसवर रेल्वे डब्यांची उभारणी करण्यासाठी केलेल्या कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीकरिता लागणाऱ्या मालातील मत्तेचे हस्तांतरण. |
| १५ | पडाव तरी, खेचहोड्या, मच्छीमार बोटी किंवा गाळउपसणी यंत्रे यांची उभारणी धरून जहाज-बांधणीसाठी केलेल्या कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीकरिता लागणाऱ्या मालातील मत्तेचे हस्तांतरण. |
| १६ | स्वच्छतागृहाच्या जोडण्यांसाठी, नळकामाकरिता, जलनिःसारण किंवा मलनिःसारण कामांसाठी केलेल्या कार्य-कंत्राटांच्या अंमलबजावणीकरिता लागणाऱ्या मालातील मत्तेचे हस्तांतरण. |
| १७ | भूपृष्ठाखाली किंवा पृष्ठभागावर नळमार्ग, केबल्स किंवा वाहिन्या टाकण्यासाठी केलेल्या कार्य-कंत्राटाच्या अंमलबजावणीकरिता लागणाऱ्या मालातील मत्तेचे हस्तांतरण. |

(यथार्थ अनुवाद)
**न. ब. पाटील,**
भाषा संचालक,
महाराष्ट्र राज्य.